वृत्तान्त

# मराठी विज्ञान परिषद - तिमाही अहवाल

## एप्रिल, मे, जून - 2010

■ मराठी विज्ञान परिषदेच्या नवीन इमारत योजनेमध्ये 550 व्यक्तींकडून 45 लाख रुपयांचा निधी परिषदेकडे जमा झाला.

■ दि. 20 जून रोजी शिल्पकार चरित्रकोशाचे प्रकाशन पुणे येथे झाले.

■ मराठी विज्ञान परिषद पत्रिकेच्या 2009च्या दिवाळी अंकाला रु. 12,000/-चे रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे, या दिवाळी अंकाला ठाणे वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई व मुंबई वृत्तपत्र लेखक संघ यांचे पुरस्कार मिळाले आहेत.

■ दि. 1 मे रोजी महाराष्ट्र राज्याला 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने गेल्या '50 वर्षांतील वेगवेगळ्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रांतील प्रगती' या विषयावर माहे मेचा विशेषांक प्रसिद्ध झाला. यामध्ये 17 तज्ज्ञ व्यक्तींनी लेख लिहिले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने 1000 प्रती घेऊन त्यांच्या सभासदांना वितरित केल्या.

■ दि. 4 एप्रिल व 6 जून रोजी 'शहरी शेती ओळख वर्ग' झाले. त्याचा एकूण 30 व्यक्तींनी लाभ घेतला.

■ विज्ञान तंत्रज्ञान कोशाच्या 15,000 प्रती छापून तयार झाल्या. त्यांपैकी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आदेशानुसार 13,545 प्रती महाराष्ट्रातील शाळांना पाठवण्यासाठी बालभारती, पुणे येथे पोहोचवण्यात आल्या.

■ दि. 2 मे रोजी चुनाभट्टी परिसरातील नागरिकांसाठी पाणी पंचायत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. विद्याधर वालावलकर, श्री. अ.पां. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. 30 व्यक्ती उपस्थित असलेला हा कार्यक्रम 'पर्यावरण दक्षता मंच' संस्थेच्या सहकार्याने साजरा करण्यात आला.

■ सर्व महाराष्ट्रभर पाणी टंचाई जाणवत आहे. या बाबतीत लोकांना जागरूक करण्याकरिता मराठी विज्ञान परिषदेने मुंबई व ठाण्यात मिळून आतापर्यंत 130 भाषणे केली. याचा 9200 व्यक्तींनी लाभ घेतला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण दक्षता मंचाच्या सहकार्याने पाणीविषयक 6 फिल्म दि. 13 जून रोजी दाखवण्यात आल्या. त्या वेळी 30 व्यक्ती उपस्थित होत्या.

■ मराठी विज्ञान परिषदेचा चव्वेचाळिसावा वर्धापन दिन दि. 25 एप्रिल रोजी झाला. प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विद्यापीठाचे कुलगुरू आणि प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ डॉ. दिलीप देवबागकर होते. कार्यक्रमामध्ये परशुराम बाजी आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कार, लीला परशुराम आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कार, शरद नाईक विज्ञान संशोधन पुरस्कार आणि हरिभाऊ मोटे पारितोषिकांचे वितरण झाले.

■ या वर्षी 'लोकसत्ता' दैनिकातील 'कुतूहल'मध्ये वैद्यकशास्त्राविषयी माहिती दिली जात आहे. या सदराचे आयोजन डॉ. शशिकांत प्रधान करत आहेत. या सदराला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

■ **महिला दिन :** 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या निमित्ताने दरवर्षी मराठी विज्ञान परिषदेत महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. 20 मार्च रोजी श्रीमती नियती चितालिया यांचे 'ताणतणाव आणि मानसिकता' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाला लक्ष्मीबाई खानोलकर शाळेतील 60 विद्यार्थिनी उपस्थित होत्या. व्याख्यानानंतर विद्यार्थिनींनी प्रश्न विचारले, त्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे वक्त्यांनी दिली.

आय.एल.अॅन्ड एफ.एस. या वित्तीय कंपनीच्या एज्युकेशन अॅन्ड टेक्नॉलॉजी लि. या विभागाने मराठी विज्ञान परिषदेशी संपर्क साधून परिषदेत होणाऱ्या नवनवीन प्रयोगांविषयी माहिती करून घेतली. हे प्रयोग अत्यंत उपयुक्त आहेत, जगभरातील सर्व लोकांपर्यंत हे प्रयोग जाणे गरजेचे आहे, अशी भूमिका मांडली. प्रयोग सर्व लोकांपर्यंत जाण्यासाठी इंटरनेटवर समाविष्ट करावे लागतील. त्यासाठी या प्रयोगांचे चित्रीकरण करण्याची तयारी दर्शविली. दिनांक 7, 8 आणि 9 एप्रिलला 30 निवडक प्रयोगांचे चित्रीकरण विज्ञान भवनात करण्यात आले. यासाठी लागणारे आर्थिक साहाय्य आय.ई.टी.एस. या विभागाने दिले.

■ **संकल्पना विकसन अभ्यासक्रम :** माटुंगा येथील शिशुवन हायस्कूल येथे 27, 29 आणि 31 मार्च या तीन दिवसांत सातवी आणि आठवीच्या प्रत्येकी 25 विद्यार्थ्यांसाठी प्रयोगांची सहा सत्रे घेतली. याच शाळेत 1, 2, 3, 4 आणि 10 एप्रिल या पाच दिवसांत प्रत्येक दिवशी दोन याप्रमाणे प्रयोगांची 10 सत्रे घेण्यात आली. सातवीचे 18 आणि आठवीचे 20 विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

माहीम येथील सरस्वती मंदिर या शाळेत12 एप्रिलला सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन सत्रे झाली. त्या वेळी 17 विद्यार्थी उपस्थित होते.

2010-11 या शैक्षणिक वर्षातील पहिला कार्यक्रम 6 जून रोजी झाला. पाचवी, सहावी, सातवी आणि आठवी या चार वर्गांसाठी प्रत्येकी एक सत्र घेण्यात आले. त्यामध्ये पाचवीचे 9, सहावीचे 27, सातवीचे 15 आणि आठवीचे 23 विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. 13 जून रोजी सहावीच्या विद्यार्थ्यांसाठीचे दुसरे सत्र झाले. अभ्यासक्रमाशी संबंधित विषयावर आधारित एलसीडी सादरीकरण 25 विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

14 जून रोजी सातवी, आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगांचे दुसरे सत्र आयोजित केले होते. सातवीचे 23 विद्यार्थी आणि आठवीचे 32 विद्यार्थी उपस्थित होते.

■ **वयात येताना :** दि. 7 एप्रिल रोजी चुनाभट्टी येथे मुलींसाठी संस्कार शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात 35 विद्यार्थिनींना 'वयात येताना मुलींसाठी' हा दृकश्राव्य कार्यक्रम दाखवला.

■ **बालोद्यान :** 11 आणि 12 एप्रिल रोजी दुसरी ते चौथीच्या मुलांसाठी बालोद्यान कार्यक्रम झाला. त्यात 21 विद्यार्थी सहभागी झाले होते.

■ **विज्ञानमित्र :** 14 ते 19 एप्रिल या कालावधीत 'विज्ञानमित्र' हे शिबिर आयोजित केले होते. सहावी ते नववीचे 16 विद्यार्थी या शिबिरात सामील झाले होते.

रत्नागिरी जिल्ह्यातील विद्याविहार इंग्लिश स्कूल या शाळेतील 41 विद्यार्थ्यांसाठी 22 ते 24 एप्रिल हे चार दिवस विज्ञानमित्र शिबिर झाले.

■ **विज्ञान खेळणी :** दि. 11 आणि 12 एप्रिल दोन दिवस विज्ञान खेळणी शिबिर आयोजित केले होते. तिसरी ते पाचवीचे विद्यार्थी यांचा लहान गट आणि सहावी ते नववीचे विद्यार्थी यांचा मोठा गट अशी या शिबिराची विभागणी केली होती. लहान गटातील 50 विद्यार्थी आणि मोठ्या गटातील 30 विद्यार्थ्यांनी स्वत: हाताने वेगवेगळी खेळणी या शिबिरात तयार केली.

दि. 28 मे रोजी ट्रॉम्बे येथे 35 मुलांसाठी विज्ञान खेळणी शिबिर झाले.

■ **शिक्षक कृतिसत्र :** दि. 21 एप्रिल रोजी आजगाव, जि. रत्नागिरी येथे डी.एड.च्या विद्यार्थ्यांसाठी (भावी प्रा. शिक्षक) कृतिसत्र घेण्यात आले.

परिसरातील साहित्यातून विज्ञान शिक्षण साहित्य कसे निर्माण करता येईल या संदर्भात कृतिसत्रात मार्गदर्शन केले गेले.

23, 24 एप्रिल या दोन दिवस सेंट कॅथरिन हायस्कूल, अंधेरी येथे कृतिसत्र झाले. या कृतिसत्राला 5 शिक्षक उपस्थित होते. इयत्ता नववी आणि दहावीच्या पाठ्यपुस्तकातील विषयावर प्रयोग आणि एलसीडी सादरीकरण या कृतिसत्रात दाखविण्यात आले.

■ **विज्ञान सफर :** एल अँड टी या कंपनीतील कर्मचारीवर्गाच्या 45 पाल्यांसाठी विज्ञान सफर हा कार्यक्रम झाला. 28 एप्रिल रोजी हा कार्यक्रम झाला.

दि. 3 मे रोजी विज्ञान सफर कार्यक्रम झाला. त्या वेळी 40 विद्यार्थी उपस्थित होते. परळच्या संस्थेमार्फत हे विद्यार्थी आले होते.

### आगामी कार्यक्रम

■ दि. 4 जुलै, 1 ऑगस्ट आणि 5 सप्टेंबर रोजी 'शहरी शेती ओळखवर्ग' घेण्यात येईल.

■ दि. 22 ऑगस्ट रोजी संस्थेची वार्षिक सभा व त्यानंतर कार्यकारिणी सभा आहे.

### 16 मार्च ते 15 जून, 2010 या कालावधीतील अनुदान व देणगीदारांची नावे

| | |
|---|---|
| मॉर्गन स्टॅन्ले इंडिया लि. (ग्रामीण भागात विज्ञान प्रसार) | 2,50,000/- |
| वनाझ इंजिनिअरिंग लि., पुणे (पत्रिका) | 80,000/- |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (शास्त्रज्ञ वार्तालाप कार्यक्रम) | 71,500/- |
| श्री. एन.व्ही. जोशी, बंगलोर (पत्रिका) | 51,000/- |
| श्री. बळवंत बापट (शहरी शेती पुस्तक) | 25,000/- |
| श्री. नरेंद्र कोचरेकर | 25,000/- |
| श्रीमती सुनीता जोशी | 25,000/- |
| डॉ. चंद्रकांत वागळे (पारितोषिक निधी) | 20,000/- |
| श्री. विवेकानंद वागळे (राखीव निधी) | 10,000/- |
| डॉ. (श्रीमती) एस.एच. धायगुडे | 10,000/- |
| श्रीमती नीला देशमुख (शाळा व ग्रंथालयांना पुस्तके, निधीसाठी) | 10,000/- |
| मडगांवकर ट्रस्ट | 10,000/- |
| श्रीमती जयंती जोशी | 10,000/- |
| श्री. य.द. जोशी | 5,001/- |
| श्रीमती नलिनी मराठे | 5,000/- |
| श्री. अनिल बापट | 5,000/- |
| कल्याण जनता सहकारी बँक लि. | 5,000/- |
| श्री. प्रदीप जामसंडेकर | 3,500/- |
| डॉ. चंद्रकांत वागळे | 3,500/- |
| श्रीमती मैत्रेयी खरे (सौरकालगणना पुस्तिका) | 2,500/- |
| डॉ. सुमती मुडांबी | 2,001/- |
| श्री. अरविंद परचुरे | 2,000/- |
| श्री. एस.जी. आरस | 1,001/- |
| श्रीमती सरिता भागवत | 1,001/- |
| श्री. राजीव वर्तक | 1,000/- |
| श्री. दिलीप हेर्लेकर | 1,000/- |

### नवीन इमारत निधी देणगीदार

| | |
|---|---|
| मुरली लाज चुगानी चॅरिटी ट्रस्ट | 2,00,000/- |
| श्री. बी.जी. देशमुख, पुणे | 1,00,000/- |
| श्री. शैलेंद्र के. हाजेला, दिल्ली | 50,000/- |
| अॅक्वा बिनोव्हलंट फंड | 50,000/- |
| उषा एन्टरप्रायझेस | 15,000/- |
| श्री. अद्वैत शिंदे | 12,000/- |
| श्री. शिरीष भागवत | 10,000/- |
| डॉ. अजित प्रभावळकर | 10,000/- |
| श्री. दिलीप प्रभावळकर, पुणे | 12,000/- |
| श्रीमती सुनंदा करंदीकर | 10,000/- |
| श्रीमती अल्का महाजन | 10,000/- |
| मे. इ.एफ.वाय. एन्टरप्रायझेस, दिल्ली | 10,000/- |
| श्री. यशोधन जोशी, बंगलोर | 10,000/- |
| श्री. जयंता मुखोपाध्याय, कलकत्ता | 10,000/- |
| मे. इ.एफ.वाय. एन्टरप्रायझेस, वरळी | 10,000/- |
| श्री. महावीर अनगोळ | 10,000/- |
| श्री. दिनेश देवरा | 10,000/- |
| श्री. नी.ना. श्रीखंडे | 10,000/- |
| श्री. निलेश गांधी | 6,000/- |
| श्री. मोरेश्वर आजगांवकर | 5,001/- |
| श्री. दिलीप पेंडसे | 5,000/- |
| श्रीमती सुशीला गुणे | 5,000/- |
| डॉ. शशिकांत प्रधान | 5,000/- |
| श्रीमती माधुरी जोशी | 5,000/- |
| श्री. राजाराम पाध्ये | 5,000/- |
| श्रीमती उषा मेहता | 5,000/- |
| श्री. रतिलाल शहा | 3,000/- |
| श्री. महादेव खांडेकर | 3,000/- |
| श्रीमती अनुराधा अंबिके | 2,500/- |
| श्री. यशवंत रानडे | 2,000/- |
| श्रीमती प्रभा पुरोहित | 2,000/- |
| श्री. अनिल वाकणकर | 2,000/- |
| श्रीमती अनुजा उकिडवे | 2,000/- |
| श्री. अशोक यार्दी | 2,000/- |
| श्री. नितीन अनगोळ | 2,000/- |
| श्री. शशिकांत म्हेत्रस, सोलापूर | 2,000/- |
| श्री. चैतन्य म्हेत्रस, सोलापूर | 2,000/- |
| श्री. प्रमोद बुटाला | 1,100/- |
| श्री. हरिहर आठलेकर, सावंतवाडी | 1,025/- |
| श्री. रविंद्र कानडे | 1,001/- |

**प्रत्येकी रु. 1,000/- :** श्री. मोहन बापट, श्री. प्रभाकर भोसले (पुणे), श्री. विष्णू खांडेकर, श्री. मंगेश खांडेकर, श्री. हेमंत खांडेकर, श्रीमती नलिनी खांडेकर, श्री. प्रदीप म्हात्रे, श्रीमती जयमाला गोडबोले, श्रीमती वृंदा दाभोळकर, श्री. के.व्ही. अनगोळ, श्री. नरेश कुलकर्णी, श्रीमती सुनीता अभ्यंकर, श्री. शरदचंद्र खेऊर, श्रीमती प्रतिमा अग्निहोत्री (पुणे), श्री. अनंत कदम (वसई), श्री. ओमेगा कुलकर्णी (सोलापूर), श्री. पी.एस. पाजगडे (अमरावती)

| | |
|---|---|
| श्री. विनायक दामले | 600/- |
| श्री. व्ही.के. काटदरे | 501/- |